ePaper **शिवसेना-राष्ट्रवादी पक्ष आम्ही फोडले नाहीत ; अमित शाहांचं वक्तव्य!**

| वर्ष - 7 । अंक - 298 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 16 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- कमिन्स चालवणार वॉर्नचा वारसा?
- तेजश्रीने गुपचूप उरकला साखरपुडा
- मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन
- आज निवडणुकीचा बिगुल वाजणार ?


# खेळाडू दत्तक योजनेचा दिखावा!

## » पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्रीडा विभागाच्यावतीने अर्ज मागविले

### प्रत्यक्ष अंमलबजावणीला संथ गती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी

**कोरोना पासून बंद असलेल्या खेळाडू दत्तक योजना प्रत्यक्ष राबविण्याएवजी केवळ अर्ज मागविण्याचा फार्स सुरू आहे. नुकतेच महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने या योजनेसाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. या पुर्वीही सातत्याने अर्ज मागविण्यात आले आहेत. मात्र पुढे कोणतीही कार्यवाही न झाल्याने खेळाडुंमध्ये नाराजीचा सूर आहे. ही योजना अंमलात आणून खेळाडूंची ही नाराजी या वेळी तरी दुर होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या २०१२- १३ या आर्थिक वर्षापासून विद्यार्थी खेळाडूंकरिता नव्याने खेळाडू दत्तक योजना सुरु करण्यात आलेली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील खेळाडू यासाठी पात्र आहेत. खेळाडू दत्तक योजनामधील ११ खेळ प्रकारांचा समावेश होत आहे. यामध्ये अॅथलेटिक्स, हॉकी, खो खो, बॉक्सिंग, नेमबाजी, बॅडमिंटन, क्रिकेट, जलतरण, कबडडी, कुस्ती, व लॉनटेनिस आदींचा समावेश आहे. महापालिकेच्या क्रीडा विभागाकडे ५० लाख रुपयांच्या निधीची तरतूद या योजनेसाठी आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना वार्षिक 3 हजार 300 रुपये मिळणार आहेत. तर राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम / स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना 5 हजार 500 रुपये क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन महापालिकेने खेळाडूंना केले आहे. या पुर्वीही महापालिकेने खेळाडूंना अर्ज करायला सांगितले होते. मात्र पुढे कोणतीच कार्यवाही झाली नाही. ही योजना राबविण्यासाठी नवीन धोरण तयार करून तज्ज्ञ खेळाडूंचे मार्गदर्शन घेण्याची सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिली होती. मात्र खेळाडूंनी या योजनेत असणाऱ्या मर्यादा पाहता मार्गदर्शन करण्याकडे पाठ फिरविली होती. परिणामी नवीन धोरण तयार झाले नाही. त्यामुळे योजना कागदावरच राहिली होती. जुन्या क्रीडा धोरणानुसार ही योजना राबविण्याबाबतचा विचार क्रीडा विभाग करत होते. त्यानुसार सध्या खेळाडूंना अर्ज करण्याचे आवाहन करून योजनेसाठी कार्यवाही करत असल्याचे क्रीडा विभागाकडून दाखवले जात आहे.

### इथे करा अर्ज

» ईच्छूक खेळाडूंनी क्रीडा विभाग, साईकृपा कमर्शियल कॉम्लेक्स, पीसीएमसी बिल्डींग (३ रा मजला) केएसबी पंप कंपनीसमोर, मुंबई पुणे रोड, खराळवाडी पिंपरी येथे अर्ज करायचे आवाहन महापालिकेने केले आहे. २९ फेब्रुवारी ते २८ मार्च २०२४ या काळात विहित नमुन्यातील अर्ज अथवा महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेत स्थळावर अर्ज डाऊन लोड करून घ्यायचे आहे. आवश्यक कागदपत्रांसह १५ मार्च ते २८ मार्च २०२४ या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहे. अधिक माहिती, अटी शर्ती महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावर पाहता येणार आहे

# प्रियकराच्या मदतीनं काढला पतीचा काटा

## » गुंडा विरोधी पथकाने कट उधळत पत्नीसह प्रियकराला ठोकल्या बेड्या

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



लष्करातील जवानाच्या प्रेमात पडली अन् प्रियकराच्या मदतीनं पतीचा काटा काढला. पतीची हत्या अपघाताने झाल्याचा बनाव रचत, एक कोटींचा विमा हडपण्याचा कट ही रचण्यात आला. मात्र पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकानं त्यांचं बिंग फोडलं. पतीच्या हत्येप्रकरणी पत्नी आणि लष्करातील प्रियकर जवानासह साथीदाराला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. यामुळं एकच खळबळ उडाली आहे. सुप्रिया गाडेकर असं पत्नीचं, सुरेश पाटोळे असं जवानाचं आणि रोहिदास सोनवणे असं साथीदाराचे नाव आहे. तर राहुल गाडेकर असं मयताचे नाव आहे.

### 1 कोटींचा विमा हडपण्याचा रचला होता डाव!

» राहुलचा अडथळा दूर करताना त्याच्या नावे असणारा एक कोटींचा विमा हडप करायचा असा ही डाव त्यांनी आखला. ठरल्याप्रमाणे तीन महिन्यापूर्वी म्हणजे डिसेंबरमध्ये सुरेश दिल्लीवरून सुट्टीसाठी देहूत त्याच्या घरी आला. अहमदनगर जिल्ह्यातील आते बहिणीच्या गावी जाऊन रोहिदासला याबाबत सांगितलं अन तुला तुझ्या वाटणीचे पैसे दिले जातील, असं सांगून त्याला ही या कटात सहभागी करून घेतलं. पुढं घारगाव जवळ या दोघांनी राहुलच्या गाडीवर हल्ला करत, त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला, पण राहुल यातून बचावला.

# अजित पवारांचे बंधू सुप्रिया सुळेंच्या प्रचारात

## श्रीनिवास पवार यांच्याकडे इंदापूर मतदारसंघाची जबाबदारी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवारही सुप्रिया सुळे यांच्या बाजूने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरले आहेत. त्यांच्याकडे इंदापूर विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत पवार कुटुंबीयांतील बहुतांश सदस्य माजी केंद्रीय मंत्री शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या बाजूने असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे. सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा या उमेदवार असणार आहेत. त्यामुळे नणंद-भावजय अशी ही लढत होणार असून पवार कुटुंबियांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे. शरद पवार यांच्या सोबत पवार कुटुंबीयातील बहुतांश सदस्य आहेत. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले होते. त्यानंतर आता अजित पवार यांचे धाकटे बंधू, उद्योगपती श्रीनिवास हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले आहेत.श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार या सुप्रिया सुळे यांच्या प्रचारात सक्रिय होणार आहेत. शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये पुढील शनिवारी (२३ मार्च) इंदापूर येथे मेळावा होणार आहे. त्यादृष्टीने इंदापूर तालुक्यातील प्रचाराची जबाबदारी श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. शर्मिला पवार यांनी शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून इंदापूर तालुक्याच्या दुष्काळ भागात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर केली आहेत. अल्पभूधारक, शेतकऱ्यांना व्यक्तिगत विहीर खोदाई, जमिन सपाटीकरणासाठी त्यांनी मदत केली आहे. सक्रिय राजकारणापासून काहीसे अलिप्त असले तरी, ते लोकसभेच्या निवडणूक प्रचारात सुळे यांच्या बाजूने उतरल्याने अजित पवार यांच्यापुढील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.पवार कुटुंबियातील बहुतांश सदस्य शरद पवार यांच्याबरोबर आहेत. बारामती येथील मेळाव्यात काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनीही ही बाब उघड केली होती. कुटुंबात मला एकटे पाडले जात आहे, असे विधान अजित पवार यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर आता श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांनी भेटीगाठीही सुरू केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक शरद पवार आणि अजित पवार यांच्यासाठी प्रतिष्ठेची झाली आहे. सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा या उमेदवार असणार आहेत. त्यामुळे नणंद-भावजय अशी ही लढत होणार असून पवार कुटुंबियांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे.

### अजित पवार यांच्या अडचणीत वाढ

» शरद पवार यांच्या सोबत पवार कुटुंबीयातील बहुतांश सदस्य आहेत. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले होते. अजित पवार यांचे धाकटे बंधू, उद्योगपती श्रीनिवास हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचारात उतरले आहेत.श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार या सुप्रिया सुळे यांच्या प्रचारात सक्रिय होणार आहेत. शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये पुढील शनिवारी (२३ मार्च) इंदापूर येथे मेळावा होणार आहे. त्यादृष्टीने इंदापूर तालुक्यातील प्रचाराची जबाबदारी श्रीनिवास आणि शर्मिला पवार यांच्याकडे देण्यात आली आहे. शर्मिला पवार यांनी शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून इंदापूर तालुक्याच्या दुष्काळ भागात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर केली आहेत. अल्पभूधारक, शेतकऱ्यांना व्यक्तिगत विहीर खोदाई, जमिन सपाटीकरणासाठी त्यांनी मदत केली आहे. सक्रिय राजकारणापासून काहीसे अलिप्त असले तरी, ते लोकसभेच्या निवडणूक प्रचारात सुळे यांच्या बाजूने उतरल्याने अजित पवार यांच्यापुढील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.पवार कुटुंबियातील बहुतांश सदस्य शरद पवार यांच्याबरोबर आहेत. बारामती येथील मेळाव्यात काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनीही ही बाब उघड केली होती.

# ‘डीएसके’ कुंजबन सोसायटीत आता ‘कम्युनिटी मेडिकल कीट’

## ‘एमक्यूअर फार्मासिटिकल्स’ची सामाजिक बांधिलकी; : रहिवाशांसाठी वैद्यकीय साहित्य उपलब्ध

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील डी.एस.के. कुंजबन हाऊसिंग सोसायटीतील रहिवाशांकरिता ‘कम्युनिटी मेडिकल कीट’ उपलब्ध करण्यात आले. एमक्यूअर फार्मासिटिकल्स लिमिटेडच्या ‘कॉर्पोरेट सोशल रिस्पॉसिबिलिटी’ (CSR) विभागाच्या माध्यमातून ही साधनसामुग्री देण्यात आली.**



मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाच्या पुढाकाराने ‘संकल्प शासनाचा...सहकारातून आरोग्य सेवेचा’ या हेतूने स्वयंसेवी संस्था, सार्वजनिक मंडळे आणि गृहनिर्माण सोसायटींमध्ये ‘कम्युनिटी मेडिकल कीट’ देण्यात येत आहेत. एमक्यूअर फार्मासिटिकल्स लिमिटेडच्या 'सीएसआर' विभागाचे प्रमुख गिरीश घनवट यांच्या सहकार्याने सदर कीट डीएसके सोसायटीला सुपूर्द करण्यात झाले.

सोसायटीतील कार्यकारी समितीचे सदस्य सुरेंद्र गाडे यांच्या पुढाकाराने ‘कम्युनिटी मेडिकल कीट’ उपलब्ध करण्यात आली. त्याचे लोकार्पण क्लप हाउसमध्ये करण्यात आले. यामध्ये व्हील चेअर, स्ट्रेचर, वॉकर, वॉकिंग स्टिक, प्रथमोपचार पेटी, बीपी ॲपरेटस, ग्लुकोमीटर, पल्स ऑक्सिमीटर, थरमामीटर प्राथमिक तपासणी मशीन असे वैद्यकीय साहित्य आहे. सांस्कृतिक समितीच्या सदस्या डॉ. प्रज्ञा पाटील यांनी साहित्याचा उपयोग आणि वैद्यकीय महत्त्व सांगितले. तसेच, काही रहिवाशांची रक्तदाब तपासणीही करण्यात आली.

दरम्यान, सोसायटीच्या वतीने श्री. गाडे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यकारी समितीचे सदस्य अभिजित वाळवेकर, संजय पाटील, सांस्कृतिक समितीच्या चेअरमन दिप्ती पाटील, सचिव ऋतुजा कांबळे, खजिनदार आदिती कुलकर्णी यांच्यासह सदस्य व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी, सचिव उत्तम नलावडे आणि खजिनदार युवराज पाटील यांनी या उपक्रमाचे कौतूक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या जोशी यांनी केले. मान्यवरांचे आभार अधिकराव दिवे-पाटील यांनी मानले.

### सोसायटी म्हणजे एक कुटुंब...

»कार्यकारी समितीचे सदस्य सुरेंद्र गाडे म्हणाले की, डीएसके सोसायटी ही एक कुटुंब आहे. त्यामुळे आपण सर्वजन आपआपल्या परिने सामाजिक बांधिलकी जपत काम करीत आहेत. आगामी काळात असे उपक्रम आणखी मोठ्या प्रमाणात राबवण्यासाठी पुढाकार घेवू. २९५ सदनिका असलेल्या सोसायटीमध्ये सुमारे १ हजार ५०० नागरिक वास्तव्य करतात. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सहायता कीट आवश्यक आहे.

# थेरगाव येथील बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक रस्त्याचे फूटपाथ 'अर्बन स्ट्रीट डिझाईन'!

## खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे : वर्दळ कमी होण्यास मदत होईल!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य रस्त्यांचा विकास अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार करण्यात येत आहे. यामुळे पादचाऱ्यांना, सायकल स्वारांना तसेच वाहनचालकांना विविध सुविधा उपलब्ध होत असून वर्दळ कमी होण्यासही मदत होत आहे. नागरिकांच्या हितासाठी प्रशासन काम करत असते त्यामुळे नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करून पदपथांवर किंवा रस्त्यावर वर्दळ होईल अशा प्रकारे अतिक्रमण करू नये. तसेच एक सुजाण नागरिक म्हणून आपला परिसर स्वच्छ ठेवणे, इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे तसेच शहराच्या विकासात हातभार लावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी केले.**



महापालिकेच्या वतीने थेरगाव येथील बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक या एमडीआर – ३१ रस्त्याचे फूटपाथ अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे भूमीपुजन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते, खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांच्या उपस्थितीत करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, उप आयुक्त मिनीनाथ दंडवते, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते, परिसरातील नागरिक आणि महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक या एमडीआर – ३१ रस्त्यावर पदमजी पेपरमील, बिर्ला हॉस्पिटल, महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन खात्याचे डेअरी फार्म, शाळा, कॉलेज तसेच व्यावसायिक आणि रहिवासी इमारती मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे येथे वाहनांची तसेच पादचाऱ्यांचीही मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या वर्दळीमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. ही समस्या सोडविण्यासाठी हा रस्ता अर्बन स्ट्रीट स्केपनुसार विकसित करण्याचा महापालिकेचा मानस आहे. हा प्रकल्प केवळ सुशोभिकरणासाठी नसून यामुळे वाहतुक सुरळीत होऊन पादचाऱ्यांना, सायकलस्वारांना आणि वाहनचालकांना सुलभतेने आणि सुरक्षितपणे ये-जा करण्यासाठी मदत होणार आहे. तसेच अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार पदपथ विकसित केल्याने सायकल ट्रॅक, पादचारी मार्ग आणि वाहनतळ या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. भूमिपूजन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद ओंभासे यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

### परिसरात राहणाऱ्या नागरिकांचा फायदा...

प्रकल्पाबाबत माहिती देताना सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे म्हणाले, बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक हा रस्ता हिंजवडी आय.टी. पार्क कडून डांगे चौक मार्गे चिंचवड एमआयडीसी, भोसरी, चिखलीकडे जाणाऱ्या विकास आराखड्यातील ३४.५ मीटर रुंदीचा मुख्य रस्ता आहे. तसेच हा रस्ता औंध-रावेत या ४५ मीटर रुंदीच्या बीआरटीएस रस्त्याला जोडणारा फिडर रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते आणि या रस्त्याचा अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकास करणे गरजेचे आहे. या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना याचा फायदा होणार असून रस्त्यावर बसण्यासाठी दगडी आसने, जिम साहित्य तसेच म्युरल, पॅराबोला इ. सुविधा महापालिकेच्या वतीने देण्यात येणार आहेत. तसेच रात्री पादचारी मार्गावरील चांगल्या दृश्यमानतेसाठी अत्याधुनिक पथदिवेही बसविण्यात येणार आहेत.

---

# 'नदी प्रदूषणावरून पोकळ घोषणा कशाला': संजोग वाघेरे

## निवडणुकांच्या तोंडावर सरकार घोषणा करत असल्याची टीका

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारचे मंत्री पिंपरी चिंचवड शहरात येऊन नद्यासाठी आम्ही आगामी तीन वर्षात दोन हजार कोटी खर्च करणार असल्याची घोषणा करत आहे. परंतु, ज्यांच्यासाठी ते या घोषणा करत आहेत. त्यांनी दहा वर्षाच्या आपल्या कारकीर्दीत नदी प्रदूषण रोखण्यासाठी काय केले आणि निव्वळ निवडणुकीच्या तोंडावर नदी प्रदूषणाचा आधार घेत पोकळ घोषणा कशाला, असा थेट सवाल शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे यांनी केला आहे..**




संजोग वाघेरे पाटील यांनी नदी प्रदूषणावरून सरकार आणि सरकारचे प्रतिनिधी पिंपरी चिंचवडकर नागरिक व मावळमधील शेतकरी वर्गाची दिशाभूल करत असल्याची टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, मावळ, मुळशीतून येणा-या, तसेच पिंपरी चिंचवड शहरातील तिन्ही प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अनेक ठिकाणी थेट नाले नदीत जाऊन मिळतात. एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक सांडपाणी नदीत मिसळते. त्यामुळे वारंवार नदी पात्रात फेस निर्माण होत आहे. अनेकवेळा मासांचा मृत्यू होतो. हा प्रदूषणाचा विषय अद्याप गांभीर्याने घेतला जात नाही.

देहू – आळंदी ही वारकऱ्यांची आणि संतांची भूमी असलेल्या या नद्यांचे प्रकल्प यापूर्वीच व्हायला पाहिजे होते. एवढा उशीर का लागला, निवडणुकीच्या तोंडावर खोटी आश्वासने देण्याचे काम खासदार आणि राज्य सरकारचे काही मंडळी शहरात येऊन करत आहेत. परंतु यापूर्वी त्यांना नदी प्रदूषणाचे गांभीर्याने दिसले नाही. मागील कित्येक वर्षांपासून हा प्रश्न होता. मागील दहा वर्षात ज्यांना नद्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी होती. त्यांनी या कालावधीत काय केले, असा प्रश्न वाघेरे यांनी केला आहे.

### नदी प्रदूषणाबाबत उपाययोजना करा; प्रशासनाला पत्रव्यवहार


देहूगाव येथे इंद्रायणी नदीच्या काठावर बुधवारी मोठ्या संख्येने मासे मृतावस्थेत आढळले. या नदीत देवमाशांसारखे दुर्मिळ मासे देखील असल्याचे दिसून आले. हा प्रकार गंभीर असून या संदर्भात संजोग वाघेरे पाटील यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडी) आणि पिपंरी चिंचवड महापालिका प्रशासनाला पत्र पाठवले आहे. त्यात नदी प्रदूषणाचा विषय गांभीर्याने घेऊन ते रोखण्याकरिता आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याची मागणी केली आहे.



भूमिका

**राष्ट्रवादाचा अतिरेक झाला की व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यात येते, याची संविधानकर्त्यांना देशद्रोहाबाबत झालेल्या चर्चेतून याची प्रचीती येते. संविधानाचा १९४८ चा मसुदा सादर झाला तेव्हा त्यातील स्वातंत्र्याबाबतच्या कलम १३ मध्ये 'राजद्रोह' (सेडिशन) असा शब्द वापरलेला होता. के. एम. मुन्शी यांनी हा शब्द काढून टाकावा, अशी दुरुस्ती सुचवली. ब्रिटिशांनी राजद्रोहाबाबतच्या तरतुदींचा अनेकदा गैरवापर केला होता.**

# देशप्रेमाची कालबाह्य परीक्षा



बाळ गंगाधर टिळक यांच्या विरोधात १९०८ साली राजद्रोहाचा खटला झाला तेव्हा मोहम्मद अली जिना यांनी टिळकांसाठी न्यायालयात युक्तिवाद केला होता. टिळकांचे मराठीतील अग्रलेख इंग्रजीमध्ये भाषांतरीत करून हा मजकूर ब्रिटिशविरोधी नाही, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. महात्मा गांधी यांच्या विरोधात १९२२ साली असाच खटला झाला तेव्हा गांधींनी कोणत्याही वकिलाची मदत न घेता स्वत: न्यायालयात उभे राहून गुन्हा कबूल केला. गांधी म्हणाले की ब्रिटिशांविरोधात बोलणे हा गुन्हा असेल, तर तो गुन्हा मला कबूल आहे. मला शक्य तितकी अधिक शिक्षा देण्यात यावी. गांधींच्या भूमिकेने ब्रिटिश चक्रावून गेले. गांधी म्हणाले, ब्रिटिश सरकार मानवतेच्या विरोधात गुन्हा करत आहे. कायद्याचा बडगा दाखवून व्यक्तीविषयी किंवा व्यवस्थेविषयी प्रेम निर्माण करता येत नाही. कायदेशीर तरतुदींनुसार ब्रिटिशांच्या विरोधात अप्रीती निर्माण करणे याचा अर्थ राजद्रोह होता. त्यामुळे हा राजद्रोह आपण करतो आहोत, याची जाणीव गांधींना होती आणि त्यासाठी गांधी निधड्या छातीने ठाम उभे राहिले. अशा खटल्यांचा संदर्भ देत मुन्शी यांनी स्वतंत्र भारताच्या संविधानात राजद्रोहास स्थान असू नये, यासाठी आग्रह धरला. दंड संहितेच्या अनुच्छेद १२४ (अ) मधील तरतुदींचा वापर ब्रिटिशांनी असहमतीचे आवाज दाबण्यासाठी केला, हे त्यांनी सांगितले. सेठ गोविंद दास यांनीही मुन्शींना पाठिंबा देतानाच व्यक्तिगत दाखला दिला. दास म्हणाले की त्यांच्या आजोबांनी ब्रिटिशांना सहकार्य केले म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता. आजोबांच्या या कृतींचा आपण निषेध केल्यामुळे ब्रिटिश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली मला दोषी मानले होते. त्यामुळे असे अमानुष कायदे नकोत, अशी भूमिका दास यांनी घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही सहमती दर्शवली आणि राजद्रोहाच्या उल्लेखाचे धोके स्पष्ट केले. संविधानसभेने मुन्शी यांची ही दुरुस्ती स्वीकारली आणि राजद्रोहाचा उल्लेख संविधानातून वगळण्यात आला. दुर्दैवाने संविधानातून 'राजद्रोह' हा शब्द काढला असला तरी भारतीय दंड संहितेमध्ये तो तसाच ठेवला गेला. 'केदार नाथ सिंग विरुद्ध बिहार राज्य' (१९६२) या खटल्यात राजद्रोहास कायदेशीर मान्यता असल्याचे निकालपत्र देण्यात आले. रोहन जे. अल्वा यांच्या 'अ कॉन्स्टिट्युशन टू कीप सेडिशन ॲन्ड फ्री स्पीच इन मॉडर्न इंडिया' (२०२३) पुस्तकात राजद्रोहाच्या संदर्भातील तरतुदींबाबतची गुंतागुंत मांडली आहे. संविधान सभेतील चर्चा, विविध खटल्यांमध्ये न्यायालयाने घेतलेल्या भूमिका आणि त्याचे अन्वयार्थ या सगळ्यातून तयार झालेला अंतर्विरोध त्यांनी स्पष्ट केला आहे. ब्रिटिश सरकारला साम्राज्यवादी सत्ता टिकवण्यासाठी राजद्रोहाच्या तरतुदीची गरज होती, मात्र स्वतंत्र भारतात देशप्रेमी विरुद्ध देशद्रोही असा लढा निर्माण करण्याची अजिबातच आवश्यकता नाही. शिवाय सरकार = देश किंवा एक नेता = देश, असे समीकरण असू शकत नाही. सरकारची चिकित्सा करणे आणि देशविरोधी बोलणे या दोन बाबी वेगवेगळ्या आहेत. गांधीजी म्हणाले होते त्याप्रमाणे कायद्यातून व्यक्तीविषयी/व्यवस्थेविषयी प्रेम निर्माण करता येत नाही. ते आतून उमलावे लागते आणि प्रेमाची साक्ष काढायची गरज नसते!बाळ गंगाधर टिळक यांच्या विरोधात १९०८ साली राजद्रोहाचा खटला झाला तेव्हा मोहम्मद अली जिना यांनी टिळकांसाठी न्यायालयात युक्तिवाद केला होता. टिळकांचे मराठीतील अग्रलेख इंग्रजीमध्ये भाषांतरीत करून हा मजकूर ब्रिटिशविरोधी नाही, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. महात्मा गांधी यांच्या विरोधात १९२२ साली असाच खटला झाला तेव्हा गांधींनी कोणत्याही वकिलाची मदत न घेता स्वत:गांधी म्हणाले की ब्रिटिशांविरोधात बोलणे हा गुन्हा असेल, तर तो गुन्हा मला कबूल आहे. मला शक्य तितकी अधिक शिक्षा देण्यात यावी. गांधींच्या भूमिकेने ब्रिटिश चक्रावून गेले. गांधी म्हणाले, ब्रिटिश सरकार मानवतेच्या विरोधात गुन्हा करत आहे.

## संपादकीय »

### निःपक्षपातीपणा !

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दोन माजी सनदी अधिकाऱ्यांची निवडणूक आयोगाच्या आयुक्तपदी नेमणूक केली आहे.***

ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू हे आता निवडणूक आयुक्त असतील. माजी आयुक्त अरुण गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्यानं आयोगाचे आयुक्तपद रिक्त होते. लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस उरले असताना आयुक्तांनीच राजीनामा दिल्यामुळे एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर आता पंतप्रधानांच्या समितीने दोन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची आयोगावर ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांची निवड केली आहे. उद्या, अर्थात शनिवारी लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे.त्यांच्यानंतर आलेले किती निवडणूक आयुक्त आणि मुख्य निवडणूक आयुक्त आपल्या दिलेल्या कामाशी प्रामाणिक राहिले, हा संशोधनाचा मुद्दा आहे. अशोक लवासासारखे काही अधिकारी त्याला अपवाद आहेत, परंतु नियमाप्रमाणे काम करता न आल्यानेच त्यांनी आयोगातून बाहेर पडणे पसंत केले होते.

जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या दहा वर्षांत न झालेल्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या ताज्या केंद्रशासित प्रदेशातील राजकीय पक्षांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक एकाचवेळी घेण्याची आग्रही मागणी केली आहे.

# काश्मीरमध्ये निवडणुका घ्या, राजकीय कोंडी फोडा!

ऑगस्ट २०१९मध्ये जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर केंद्र सरकारच्या या निर्णयाला कडाडून विरोध करणारे भाजपेतर राजकीय पक्ष आता निवडणुकांना प्राधान्य देऊ लागले आहेत. जागतिक स्तरावर भाजप आणि मोदी सरकारकरिता अनुकूल वातावरणनिर्मिती करण्यासाठीही जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका घेणे फायद्याचे ठरणार आहे. तेथील सर्वच राजकीय पक्षांना निवडणुका हाच कोंडी फोडण्याचा एकमेव मार्ग असल्याचे वाटू लागले आहे. निवडणुका ही त्यांची राजकीय अपरिहार्यता होऊन बसली आहे.जम्मू-काश्मीरमध्ये २०१४ मध्ये विधानसभेची निवडणूक झाली होती, मेहबुबा मुफ्ती यांची 'पीडीपी' आणि भाजप या दोन्ही कडव्या विरोधकांनी एकमेकांशी जळवून घेत चार वर्षे कसेबसे सरकार चालवले होते. त्यावेळी संघाचे अभ्यासू राम माधव यांच्याकडे भाजपने जम्मू-काश्मीरची जबाबदारी दिली होती.



त्यांनी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांना विश्वासात न घेता २०१८ मध्ये दिल्लीतील भाजपच्या मुख्यालयात 'पीडीपी'शी काडीमोड घेण्याची घोषणा केली होती. त्यानंतर मुफ्ती यांनी राजीनामा दिला. ही जम्मू-काश्मीरमधील दशकभरातील अखेरची राजकीय घडामोड होती.जम्मू-काश्मीरमध्ये त्यावेळी अनुच्छेद ३७० मधील विशेषाधिकार होता, तो काढून टाकण्याला काँग्रेस, पीडीपी, नॅशनल कॉन्फरन्स आणि तेथील छोटे पक्ष या सर्वांचाच विरोध होता. लोक रस्त्यावर येत होते, दगडफेक होत होती, लष्कर कारवाई करत होते. मग, २०१९ मध्ये विशेषाधिकार काढून टाकताना केंद्र सरकारने इतकी जबरदस्त धरपकड केली की, तेथील राजकीय पक्ष आणि नेत्यांचे कंबरडे मोडले. तिथले रहिवासी अप्रत्यक्षपणे सुरक्षायंत्रणांच्या नजरकैदेत होते. आता केंद्र सरकारच्या पोलादी पकडीमुळे काश्मीर खोऱ्यात शांतता आहे. त्याविरोधात उघडपणे लढण्याची ताकद तिथल्या लोकांमध्ये वा राजकीय नेत्यांमध्ये राहिलेली नाही. कदाचित आतमध्ये लाव्हा असेल, त्याची धग जाणवतही असेल पण, ज्वालामुखी निदान फुटण्याची शक्यता आता तरी दिसत नाही. अशा परिस्थितीत जम्मू-काश्मीरमधील विद्यमान राजकीय-सामाजिक परिस्थितीतून पुढे जाण्याचा मार्ग फक्त निवडणुका हाच उरतो. त्यामुळे भाजपपासून 'माकप'पर्यंत सगळेच राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यास तयार झाले आहेत. काश्मीरच्या विशेषाधिकारावर 'पीडीपी' आणि नॅशनल कॉन्फरन्स वगळता कोणीही बोलत नाही. काँग्रेसने विशेषाधिकार परत बहाल करण्याची मागणी जवळपास सोडून दिलेली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आज निवडणुकीचा बिगुल वाजणार ?

## आज आयोगाची बैठक; 2 कोटी नवीन मतदार जोडले गेले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणूक नेमकी कधी असणार आहे? याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतंच एक वक्तव्य केलं होतं की दोन दिवसात आचारसंहिता लागू शकते त्याप्रमाणेच घडणार आहे. शनिवारी दुपारी ३ वाजता निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे. निवडणूक आयोगाच्या या पत्रकार परिषदेकडे देशाचं लक्ष असणार आहे.**

लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम आणि काही विधानसभा यांची घोषणा १६ मार्चला केली जाणार आहे. त्यामुळे १६ मार्चपासून लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजणार यात काहीही शंका नाही. या कार्यक्रमानंतर निवडणुकीच्या राजकीय लढाईचे टप्पे जाहीर होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा नेत्याने तिसरी टर्मही आमचीच असेल असा दावा केला आहे. तर यावेळी आम्ही मोदींना पंतप्रधान होऊ देणार नाही असं इंडिया आघाडीने म्हटलं आहे. आता निवडणूक आयोग कुठे आणि कधी टप्पे जाहीर करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. यावेळी लोकसभेच्या निवडणुका ६ ते ७ टप्प्यात घेतल्या जातील असे मानले जात आहे. निवडणुका जाहीर होताच संपूर्ण देशात आदर्श आचारसंहिताही लागू होणार आहे.

गेल्या वेळी २०१९ मध्ये सार्वत्रिक निवडणुकांची तारीख १० मार्च रोजी जाहीर करण्यात आली होती. गेल्या वेळी ११ एप्रिल ते १९ मे दरम्यान टप्प्याटप्प्याने लोकसभा निवडणुका झाल्या होत्या. गेल्या वेळी ६७.१ टक्के मतदान झाले होते. तर २३ मे रोजी मतमोजणी झाली. यावेळी लोकसभा निवडणुकीत सुमारे ९७ कोटी लोक मतदान करणार आहेत. यावेळी निवडणुकीत भ्रष्टाचार रोखण्यासाठी अनेक नवी पावले उचलली जातील,




असा दावा आयोगाने केला आहे. गेल्या वेळी २०१९ मध्ये सार्वत्रिक निवडणुकांची तारीख १० मार्च रोजी जाहीर करण्यात आली होती. गेल्या वेळी ११ एप्रिल ते १९ मे दरम्यान टप्प्याटप्प्याने लोकसभा निवडणुका झाल्या होत्या. गेल्या वेळी ६७.१ टक्के मतदान झाले होते. तर २३ मे रोजी मतमोजणी झाली. यावेळी लोकसभा निवडणुकीत सुमारे ९७ कोटी लोक मतदान करणार आहेत. यावेळी निवडणुकीत भ्रष्टाचार रोखण्यासाठी अनेक नवी पावले उचलली जातील, असा दावा आयोगाने केला आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपनं २०१४ च्या तुलनेत मोठा विजय मिळवला होता. २०१४ मध्ये भाजपनं २८२ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ मध्ये ३०३ जागा जिंकल्या होत्या. तर एनडीएला ३५३ जागा मिळाल्या होत्या. भाजपला ३७.७ टक्क्यांपेक्षा जास्त मतं मिळाली होती, तर ला ४५ टक्के मतं मिळाली होती. काँग्रेसला केवळ ५२ जागा जिंकता आल्या होत्या.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९७ कोटी लोक मतदान करू शकतील. ८ फेब्रुवारी रोजी, निवडणूक आयोगाने सर्व २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांच्या मतदारांशी संबंधित विशेष सारांश पुनरावृत्ती २०२४ अहवाल प्रसिद्ध केला होता. आयोगाने सांगितले की, १८ ते २९ वयोगटातील २ कोटी नवीन मतदार मतदानात सामील झाले आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत नोंदणीकृत मतदारांच्या संख्येत ६ टक्के वाढ झाली आहे.लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम आणि काही विधानसभा यांची घोषणा १६ मार्चला केली जाणार आहे. त्यामुळे १६ मार्चपासून लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजणार यात काहीही शंका नाही. या कार्यक्रमानंतर निवडणुकीच्या राजकीय लढाईचे टप्पे जाहीर होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा नेत्याने तिसरी टर्मही आमचीच असेल असा दावा केला आहे. तर यावेळी आम्ही मोदींना पंतप्रधान होऊ देणार नाही असं इंडिया आघाडीने म्हटलं आहे. आता निवडणूक आयोग कुठे आणि कधी टप्पे जाहीर करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. यावेळी लोकसभेच्या निवडणुका ६ ते ७ टप्प्यात घेतल्या जातील असे मानले जात आहे. निवडणुका जाहीर होताच संपूर्ण देशात आदर्श आचारसंहिताही लागू होणार आहे.

### प्रचारात मुलांचा वापर करू नये

» दरम्यान, ५ फेब्रुवारी रोजी निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना निवडणूक प्रचारात कोणत्याही स्वरुपात लहान मुलांचा वापर करू नये, असा सल्ला दिला आहे. पक्षांना पाठवलेल्या ॲडव्हायझरीमध्ये, निवडणूक पॅनलने पक्ष आणि उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोस्टर्स आणि पॅम्प्लेट वाटणे आणि मुलांमध्ये घोषणाबाजी करणे याला खपवून घेतंल जाणार नाही, असा इशारा दिला आहे. लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम आणि काही विधानसभा यांची घोषणा १६ मार्चला केली जाणार आहे. त्यामुळे १६ मार्चपासून लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजणार यात काहीही शंका नाही. या कार्यक्रमानंतर निवडणुकीच्या राजकीय लढाईचे टप्पे जाहीर होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा नेत्याने तिसरी टर्मही आमचीच असेल असा दावा केला आहे. तर यावेळी आम्ही मोदींना पंतप्रधान होऊ देणार नाही असं इंडिया आघाडीने म्हटलं आहे. आता निवडणूक आयोग कुठे आणि कधी टप्पे जाहीर करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. यावेळी लोकसभेच्या निवडणुका ६ ते ७ टप्प्यात घेतल्या जातील असे मानले जात आहे. निवडणुका जाहीर होताच संपूर्ण देशात आदर्श आचारसंहिताही लागू होणार आहे.

# शेतकरी कर्ज : १ लाख ६० हजारपर्यंत मुद्रांक शुल्क माफ

## एका क्लिकने शेतकऱ्यांच्या खात्यात पीक कर्जाची रक्कम जमा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शेतकऱ्यांच्या एक लाख ६० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. बीड जिल्ह्यातील किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटल माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली.**

सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहणारे आहे. डिजीटल क्रांतीचा वापर शेतकऱ्यांसाठी करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या डिजीटल प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती येणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले. कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील २२ शेतकऱ्यांच्या खात्यात किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून थेट रक्कम एका क्लिकद्वारे जमा करण्यात आली. या कार्यक्रमास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार बालाजी कल्याणकर,



आमदार राजेश पवार, आमदार संजय रायमुलकर, कृषि विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनूप कुमार, कृषि आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटायझेशनच्या या जनसमर्थ प्रकल्पासाठी देशातील दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला. बीड जिल्ह्यातील महसूल, कृषि अशा विविध विभागांनी एकत्र येऊन गेल्या काही दिवसांत ४ लाख ७५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी करून त्यांचे फार्मर्स आयडी तयार केले आहेत. याकरिता दोन ॲपचीही निर्मिती करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्याला कागदपत्र विरहीत आणि घरबसल्या अल्पमुदतीच्या कर्जासाठी अर्ज करता येतो. याशिवाय या आयडीमुळे त्यांना शासनाच्या अन्य योजनांसाठीही अर्ज करणे आणि लाभ घेणे सुलभ होणार आहे. "ॲग्रीस्टॅक-सीपीएमयू" यांच्याकडून या प्रकल्पाचे कार्यान्वयन केले जात आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आमचे सरकार सर्वसामान्यांचे आणि शेतकऱ्यांचे आहे. हे सरकार बळीराजाचे आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी, गारपीट अशा नैसर्गिक संकटात आपण त्यांना भरभरून मदत केली आहे. आपला देश कृषि प्रधान आहे. आपण शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानूनच सर्व योजनांचे नियोजन करतो आहोत. शेतकऱ्याना गेल्या दिड वर्षात ४५ हजार कोटींचे मदत आपण केली आहे. सिंचनांचे १२० प्रकल्प मार्गी लावले आहेत.

### सहा जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प

» यामुळे राज्यातील १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. शेती, माती आणि शेतकरी यांच्याशी आपली नाळ जोडलेली आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्य सरकार राबवत असलेल्या एक रुपयात पीक विमा, जलयुक्त शिवार अशा योजनांचीही माहिती दिली. मंत्री श्री. मुंडे म्हणाले की, देशातील सहा जिल्ह्यात हा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात आला.

# मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन

## » शेतकरी संघटनांचा महापंचायत मेळाव्यात निर्धार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावरील महापंचायतीमध्ये आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. संयुक्त किसान मोर्चासह शेतकऱ्यांच्या ३७ संघटनांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. फेब्रुवारीपासून पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी शंभू सीमेवर ठाण मांडले होते. शेतकरी मृत्यूनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर आंदोलनाची टप्प्याटप्प्याने धार वाढविण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे.**




त्यानुसार शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर महापंचायत आयोजित केली होती.पिकांना किमान हमीभाव (एसएमपी) मिळण्यासाठी कायदा करण्यासह अन्य विविध मागण्यासांठी त्यांनी केंद्र सरकारला इशारा दिला आहे. केंद्र सरकारने चर्चेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याची मागणीही या बैठकीमध्ये करण्यात आली.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीसह पंजाब आणि हरियाणामध्येही पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. शेतकरी संघटनेचे नेते राकेश टिकैत म्हणाले, हे सरकार तुम्हाला धमकावण्याचा प्रयत्न करेल. वाटेत वाहने अडवली जात आहेत; पण तुम्ही घाबरू नका. या लोकांची नजर तुमच्या जमिनीवर आहे. जमीन वाचवण्यासाठी आंदोलन आवश्यक आहे. महापंचायतीत युनायटेड किसान मोर्चाने केंद्र सरकारच्या विरोधात ठराव मंजूर केला. आता ९ दिवसांनी शेतकरी प्रत्येक गावात लोकशाही वाचवा कार्यक्रमाचे आयोजन करणार आहेत.राकेश टिकैत म्हणाले, ही महापंचायत मोदी सरकारच्या कॉर्पोरेट समर्थक, जातीयवादी, हुकूमशाही धोरणांविरुद्धचा लढा अधिक तीव्र करेल. तसेच शेती, अन्न सुरक्षा, उदरनिर्वाह आणि लोकांना कॉर्पोरेट लुटीपासून वाचवण्यासाठी संकल्प पत्र तयार केले जाईल. संघर्ष आणखी तीव्र करण्यासाठी महापंचायत योजना जाहीर करण्यात येणार असून, यात शेतकरी संघटनांसह केंद्रीय कामगार संघटना, प्रादेशिक महासंघ आदी संघटना सहभागी होणार आहेत.

### जमीन वाचवण्यासाठी आंदोलन

» शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावरील महापंचायतीमध्ये आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. संयुक्त किसान मोर्चासह शेतकऱ्यांच्या ३७ संघटनांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. फेब्रुवारीपासून पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी शंभू सीमेवर ठाण मांडले होते. शेतकरी मृत्यूनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर आंदोलनाची टप्प्याटप्प्याने धार वाढविण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार शेतकरी संघटनांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर महापंचायत आयोजित केली होती. पिकांना किमान हमीभाव (एसएमपी) मिळण्यासाठी कायदा करण्यासह अन्य विविध मागण्यासांठी त्यांनी केंद्र सरकारला इशारा दिला आहे. केंद्र सरकारने चर्चेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याची मागणीही या बैठकीमध्ये करण्यात आली. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीसह पंजाब आणि हरियाणामध्येही पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. शेतकरी संघटनेचे नेते राकेश टिकैत म्हणाले, हे सरकार तुम्हाला धमकावण्याचा प्रयत्न करेल. वाटेत वाहने अडवली जात आहेत; पण तुम्ही घाबरू नका. या लोकांची नजर तुमच्या जमिनीवर आहे. जमीन वाचवण्यासाठी आंदोलन आवश्यक आहे.

## 'ड्रोन' पाडण्याचे 'गरुड' पक्षाला प्रशिक्षण

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

तेलंगणा पोलिसांनी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. तेलंगणा पोलिसांकडून गरुड पक्षाला शत्रूच्या ड्रोनला कसे रोखायचे? यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. याची यशस्वी चाचणीदेखील करण्यात आली असून यामध्ये गरुड पक्षाला विशेष प्रशिक्षण देण्यात आल्याप्रमाणे ते काम करण्यात यशस्वी ठरले आहेत. त्यामुळे या पुढच्या काळात धोकादायक ड्रोनच्या धोक्यांचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित गरुड तैनात करण्याची योजना आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या गरुडांना दररोज एक तासाचे प्रशिक्षण दिले जात होते. नेदरलँड, फ्रान्स या देशासह युरोपियन देशामध्ये अशा प्रकारचा उपाय योजिला जातो. आता युरोपियन देशाची प्रेरणा घेऊन गरुड पक्षाला शत्रूच्या ड्रोनला कसे रोखायचे? याबाबतचे प्रशिक्षण दिले गेले आहे. हे प्रशिक्षण जवळपास मागील तीन वर्षांपासून देण्यात येत होते. अखेर गरुड पक्षी यामध्ये यशस्वी झाले आहेत. तेलंगणातील हैदराबादच्या मोइनाबाद येथील इंटीग्रेटेड इंटेलिजेंस प्रशिक्षण अकादमी () या ठिकाणी पोलिस महासंचालक रवी गुप्ता आणि वरिष्ठ 'आयपीएस' अधिकारी यांच्या उपस्थितीत एका प्रशिक्षित गरुड पक्षाने एका ड्रोनला खाली पाडले. गेल्या तीन वर्षांपासून या गरुड पक्षांना प्रशिक्षण देण्यात येत होते. प्रशिक्षणामध्ये हे गरुड पक्षी यशस्वी ठरले आहेत.अनेकदा राजकीय नेत्यांच्या व्हीव्हीआयपी भेटी, सार्वजनिक सभा आणि कार्यक्रमादरम्यान शत्रूच्या ड्रोनच्या धोका असतो. मात्र, यासाठी आता या प्रशिक्षित गरुड पक्षांचा वापर करण्याची तेलंगणा पोलिसांची योजना आहे. हे प्रशिक्षित गरुड पक्षी अशा 'व्हीव्हीआयपी' नेत्यांच्या भेटी, सार्वजनिक सभा आणि कार्यक्रमादरम्यान तैनात केले .

## ईव्हीएम : न्यायालयाने आरोप फेटाळले

### » जनसंघानं नेहमीच फाळणीचा विरोध केला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमवरील विश्वासाला पुन्हा प्रतिसाद देत, आज १९ लाखांहून अधिक ईव्हीएम गहाळ झाल्याची शंका आणि निवडणुका घेण्यासाठी बॅलेट पेपरचा वापर करण्याबाबत अशा दोन रिट याचिका फेटाळून लावल्या. १९ लाख गहाळ ईव्हीएम याचिकेप्रकरणी निर्णय देताना, माननीय न्यायालयाने अशा शंका आणि आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले आहे व हे प्रकरण भारत निवडणूक आयोगाच्या बाजूने निकाली काढले आहे.**



याचिकाकर्ता- ने अशी भीती व्यक्त केली की, २०१६-१९ दरम्यान भारत निवडणूक आयोगाच्या कोठडीतून गहाळ झालेल्या १९ लाख ईव्हीएमचा वापर आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ मध्ये फेरफार करण्यासाठी केला गेला असता. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे कलम ६१ बाजूला सारुन बॅलेट पेपर वापरून निवडणुका घेण्यासंदर्भातील आणखी एका याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देताना मा. न्यायमूर्ती खन्ना यांनी निरीक्षण नोंदविले की ईव्हीएमच्या कामकाजाशी संबंधित विविध मुद्द्यांवर १० हून अधिक प्रकरणे तपासण्यात आली आहेत. मा.न्यायालयाने वेळोवेळी याचिका फेटाळताना ईव्हीएमच्या कार्यपद्धतीवर नेहमीच विश्वास दर्शविला आहे.

गेल्या दशकात आणि सुमारे ४० निकालांमध्ये, मा.सर्वोच्च न्यायालयाने भारत निवडणूक आयोग आणि या संबंधांतील पारदर्शक प्रक्रिया आणि कठोर प्रशासकीय कार्यप्रणालीवर त्यांची श्रध्दा आणि विश्वास कायम ठेवला आहे, त्यामुळे भारतात च्या बाजूने मिळत असलेल्या न्यायाला प्रचंड मूल्य आणि सामर्थ्य मिळाले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे नवीनतम निर्णय, मा. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या आदेशांच्या मजबूत आणि वाढत्या प्रतिमेमध्ये आणखीच भर घालतात, ज्यांनी विविध ईव्हीएम प्रकरणांची तपासणी केली आहे आणि भारत निवडणूक आयोगाच्या बाजूने निर्णय दिला आहे. तसेच हेही लक्षात घ्यावे की अलीकडील एका प्रकरणात (मध्य प्रदेश जन विकास पक्ष विरुद्ध भारतीय निवडणूक आयोग, विशेष रजा याचिका (सिव्हिल) १६८७०/ २०२२, सप्टेंबर, २०२२), माननीय सर्वोच्च न्यायालयाने अर्जदारास ५०,००० रुपये एवढा दंड ठोठावला आहे. याचिकाकर्त्याने असे निरीक्षण नोंदवले की, देशात अनेक दशकांपासून ईव्हीएमचा वापर केला जात आहे, परंतु वेळोवेळी उपस्थित केलेले मुद्दे खोडण्यात आले आहेत.

# ताज हॉटेलमध्ये दणक्यात साजरा झाला आलियाचा वाढदिवस

अभिनेत्री आलिया भट्टचा आज ३१ वा वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त चाहते व बॉलीवूड सेलिब्रिटी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. आलियाने कुटुंबियांबरोबर वाढदिवसाचं रात्री सेलिब्रेशन केलं. मुंबईतील प्रसिद्ध ताज हॉटेलमध्ये ती भट्ट व कपूर कुटुंबियांबरोबर दिसली. मध्यरात्री ताज हॉटेलमध्ये आलिया भट्टच्या वाढदिवसाचं सेलिब्रेशन करण्यात आलं. तिच्या वाढदिवसासाठी भट्ट व कपूर कुटुंबीय ताजमध्ये पोहोचले होते. आई सोनी राजदान, बहीण शाहीन भट्ट, सासूबाई नीतू कपूर, रणबीर कपूर यांच्यासह आलिया भट्टचा एक व्हिडीओ वरिंदर चावला या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये आलियाच्या मैत्रिणीदेखील दिसत आहेत.आलिया भट्टच्या वाढदिवसाला अंबानी कुटुंबातील काही सदस्यदेखील हजर होते. त्यांचा ताजमधून बाहेर पडतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. आकाश अंबानी, ईशा अंबानी व तिचे पती आनंद पिरामल हे तिघेही आलियाच्या वाढदिवसाचं सेलिब्रेशन झाल्यानंतर घरी जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.आलिया भट्टचे चाहते तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत.



३१ वर्षीय आलियाच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिच्या आगामी 'जिगरा' चित्रपटाचं शूटिंग पूर्ण झालं आहे. २०२३ मध्ये आलेला तिचा 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' चित्रपट सुपरहिट ठरला होता.अभिनेत्री आलिया भट्टचा आज ३१ वा वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त चाहते व बॉलीवूड सेलिब्रिटी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत. आलियाने कुटुंबियांबरोबर वाढदिवसाचं रात्री सेलिब्रेशन केलं. मुंबईतील प्रसिद्ध ताज हॉटेलमध्ये ती भट्ट व कपूर कुटुंबियांबरोबर दिसली. मध्यरात्री ताज हॉटेलमध्ये आलिया भट्टच्या वाढदिवसाचं सेलिब्रेशन करण्यात आलं. तिच्या वाढदिवसासाठी भट्ट व कपूर कुटुंबीय ताजमध्ये पोहोचले होते. आई सोनी राजदान, बहीण शाहीन भट्ट, सासूबाई नीतू कपूर, रणबीर कपूर यांच्यासह आलिया भट्टचा एक व्हिडीओ वरिंदर चावला या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला.

## तेजश्रीने गुपचूप उरकला साखरपुडा

सध्या सिनेसृष्टीत लगीनघाई सुरू आहे. मागील काही दिवसात मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीत कलाकारांनी लग्नगाठ बांधत आपल्या आयुष्याची नवी सुरुवात केली आहे. आता आणखी एका मराठी अभिनेत्रीने गुपचूप साखरपुडा उरकला आहे. सोशल मीडियावर फोटो पोस्ट करत चाहत्यांना ही बातमी दिली आहे. अभिनेत्री तेजश्री जाधव हिने प्रियकर रोहन सिंह सोबत साखरपुडा केला आहे. काही दिवसांपूर्वीच तेजश्रीने प्रेमाची कबुली दिली होती. प्रियकर रोहन सिंहने तिला समुद्र किनाऱ्यावर रोमँटिकपणे प्रपोज करत लग्नाची मागणी घातली होती. याचे फोटो तेजश्रीने शेअर केले होते. चाहत्यांनी या फोटोंवर लाईक्सचा वर्षाव करताना शुभेच्छा दिल्या. तेजश्रीने साखरपुड्यासाठी हिरव्या रंगाची साडी नेसून पारंपरिक लूक कॅरी केला होता. तर रोहनने हिरव्या रंगाचा कुर्ता आणि त्यावर जॅकेट परिधान केले होते.

## मुलगा असावा तर असा!

सिद्धार्थ मल्होत्राचा 'योद्धा' चित्रपट आज (१५ मार्च रोजी) प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं खास स्क्रीनिंग गुरुवारी ठेवण्यात आलं होतं. या स्क्रीनिंगला बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. इतकंच नाही तर सिद्धार्थ व त्याची पत्नी कियाराच्या आई-वडिलांनीही हजेरी लावली होती. या इव्हेंटमधील फोटो व व्हिडीओंची चर्चा आहे. 'योद्धा' च्या स्क्रीनिंमधून काही व्हिडीओ समोर आले आहे. पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आलेले सिद्धार्थचे व्हिडीओ नेटकऱ्यांचं लक्ष वेधून घेत आहेत. व्हिडीओमध्ये सिद्धार्थ व्हीलचेअरवर बसलेल्या वडिलांची काळजी घेताना दिसत आहे. हे व्हिडीओ पाहून नेटकरी त्याचं कौतुक करत आहेत, तसेच व्हिडीओवर लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. सिद्धार्थचे वडील सुनील मल्होत्रा मर्चंट नेव्हीमध्ये कॅप्टन होते. सुनील व त्यांची पत्नी रिमा त्यांचा मोठा मुलगा व सिद्धार्थचा मोठा भाऊ हर्षदबरोबर दिल्लीमध्ये राहतात. तर, सिद्धार्थ व कियारा कामानिमित्त मुंबईत असतात.'पालकांशी असं वागायचं असतं, आम्हाला प्रेरणा देण्यासाठी धन्यवाद,' 'प्रत्येक वडिलांना असाच मुलगा हवा असतो,' 'आज मी इंटरनेटवर पाहिलेली सर्वात सुंदर गोष्ट,' 'सिद्धार्थच्या वागण्यावरून त्याच्या आई-वडिलांनी दिलेले चांगले संस्कार दिसतात,' 'सिद्धार्थ खूप चांगला मुलगा आहे,'



## श्वेता सिंहनं केली पंतप्रधान मोदींना विनंती

बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्या निधनाला आता चार वर्षं पूर्ण होतील. अजूनही मनोरंजनसृष्टीत त्याची आठवण काढली जाते. प्रेक्षक, चाहते यांच्या मनात सुशांतचं अजूनही तितकंच महत्त्वाचं स्थान आहे. सुशांतच्या आकस्मिक निधनानंतर बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये खळबळ माजली होती. सुशांतच्या कुटुंबीयांनाही याचा खूप मोठा धक्का बसला होता. सुशांतने आत्महत्या केल्याचं सांगण्यात आलं होतं; परंतु त्याच्या कुटुंबीयांनी ही आत्महत्या असल्याची गोष्ट नाकारली. नंतर सुशांतची केस सीबीआयकडे सोपवण्यात आली; परंतु अजूनही या केसचा उलगडा झालेला नाही. त्याबद्दल आता सुशांतच्या बहिणीनं थेट भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदत मागितली आहे. सुशांतची बहीण श्वेता सिंहनं तिच्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात ती म्हणाली, "मी हा संदेश आपले पंतप्रधान मोदीजी यांच्यासाठी रेकॉर्ड करतेय. तुमचं लक्ष वेधून घेण्याचं कारण असं की, आता माझ्या भावाचं निधन होऊन ४५ महिने झाले आहेत. परंतु, या केसशी संबंधित सीबीआयकडून कोणतीच नवीन माहिती आमच्याकडे आलेली नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, कृपा करून या केसमध्ये तुम्ही हस्तक्षेप करा. कारण- एक कुटुंब आणि देश म्हणून आम्हाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं आम्ही अजूनही शोधतोय."सुशांतच्या बहिणीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर "सुशांतला न्याय द्या", अशा अनेक कमेंट्स आल्या आहेत. दरम्यान, अभिनेता सुशांत सिंह राजपूतचं १४ जून २०२० रोजी वांद्रे येथील राहत्या घरात निधन झालं. त्यानं आत्महत्या केली आहे, असं पोलिसांनी जाहीर केलं होतं; परंतु त्याचा उलगडा अद्याप झालेला नाही.

## ट्रोलर्सना हसतमुखाने सामोरी जाणारी बहुरंगी

वर्ष होतं २०१२...करण जोहरच्या लाडक्या 'स्टुडंट'ने बॉलीवूडमध्ये 'हिरोईन' म्हणून पदार्पण केलं. घरातच लाभलेला अभिनयाचा वारसा, सिनेविश्वात नाव कमावलेली बहीण, दिग्दर्शक वडील अन् गॉडफादर करण जोहर. या चौकटीमुळे तिच्या पहिल्याच सिनेमावर 'नेपोकिड', 'घराणेशाही'चा ठपका बसला अन् इथूनच आलिया भट्टचा 'शानदार' अभिनेत्री होण्याचा प्रवास सुरू झाला. गेल्या १२ वर्षांत प्रचंड मेहनत करून तिने प्रेक्षकांना नेपोटिझमचा 'कलंक' पुसायला 'राझी'केलं आणि बॉलीवूडची 'संघर्ष' करणारी खरी 'गंगूबाई' मीच आहे हे ठासून सांगितलं. 'हायवे' असो किंवा 'उडता पंजाब' आलियाचा हिरोईन ते अभिनेत्री होण्याचा प्रवास थक्क करणारा होता. अभिनयाची आवड, जिद्द आणि कामाप्रती असलेलं प्रेम या सगळ्याचा उत्तम मेळ साधल्यामुळे २०१२ मध्ये स्क्रीनवर दिसणाऱ्या अवखळ 'शनाया'चं रुपांतर समंजस अशा 'राणी चॅटर्जी'मध्ये कधी होऊन गेलं हे समजलंच नाही.पहिलाच चित्रपट प्रदर्शित झाल्यावर आलियाने सगळ्या टीमबरोबर 'कॉफी विथ करण'मध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी भारताचे राष्ट्रपती कोण आहेत? असा प्रश्न करणने विचारला असता आलियाने अतिउत्साहाने चुकीचं उत्तर दिलं होतं आणि इथूनच सुरू झालं ट्रोलिंग... पुरस्कार सोहळे असो किंवा पत्रकार परिषद आलियाला सर्वत्र सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले जाऊ लागले. या सगळ्या प्रसंगांचा सामना देखील अभिनेत्रीने मोठ्या धीराने केला. ट्रोलर्सला हसत-हसत उत्तर देऊन तिने सकारात्मकतेने प्रत्येकाच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली.



# कमिन्स चालवणार वॉर्नचा वारसा?

## ट्वेन्टी20 प्रकारात पहिल्यांदाच कर्णधाराच्या भूमिकेत

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ साठी सनरायझर्स हैदराबाद संघाने कर्णधारपदाचा तगडा अनुभव असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सकडे संघाचे नेतृत्व सोपवले आहे. कमिन्स हा ऑस्ट्रेलिया संघाचा यशस्वी कर्णधार आहे, ज्याच्या नावे आयसीसीची दोन मोठी जेतेपद आहेत. सनरायझर्स हैदराबाद संघाने लिलावात तब्बल २०.५ कोटी रुपये खर्चून कमिन्सला ताफ्यात दाखल करून घेतलं. पॅट कमिन्स हा एक वेगवान गोलंदाज आहे, कमिन्सचा रेकॉर्ड पाहता त्याला कर्णधार करणार असे संकेत मिळत होते आणि हैदराबाद संघाने त्याप्रमाणेच एका वेगवान गोलंदाजाला संघाचा कर्णधार नेमले. तसे पाहता, आयपीएलच्या इतिहासात फारच कमी गोलंदाजांना कर्णधाराची जबाबदारी मिळाली आहे.**

इंडियन प्रीमियर लीग म्हणजेच आयपीएल २००८ मध्ये सुरू झाली. दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेचं यंदा १७वे वर्ष आहे. देश-विदेशातील खेळाडू मिळून तयार झालेल्या या संघांचे अनेक दिग्गज खेळाडूंनी नेतृत्व केले आहे. शेन वॉर्न, अॅडम गिलक्रिस्ट, गौतम गंभीर, महेंद्रसिंग धोनी, रोहित शर्मा, डेव्हिड वॉर्नर असे काही निवडक कर्णधार आहेत, ज्यांच्या नेतृत्वाखाली संघाने आयपीएलची जेतेपद पटकावली. पण पाहायला गेलं तर आयपीएलमध्ये कर्णधारपदावर फलंदाजांचं वर्चस्व पाहायला मिळालं आहे. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच गोलंदाजांनी आयपीएल संघांचे कर्णधारपद भूषवले आहे.१७ वर्षांच्या आयपीएलच्या इतिहासात फारच कमी गोलंदाजांनी संघाचे कर्णधारपद भूषवले आहे. शेन वॉर्न, अनिल कुंबळे, रवीचंद्रन अश्विन, हरभजन सिंग, जहीर खान, डॅनियल व्हेटोरी, भुवनेश्वर कुमार, रवींद्र जडेजा, रशीद खान, सॅम करन अशा दिग्गजांसहित नव्या दमाच्या गोलंदाजांचाही या यादीत समावेश आहे.शेन वॉर्न हे नाव जागतिक क्रिकेटमधील दिग्गज खेळाडू आहे पण आयपीएलमध्येही वॉर्नच्या नावे ऐतिहासिक कामगिरी आहे.२००८ च्या आयपीएलच्या




पहिल्या हंगामाचे जेतेपद शेन वॉर्नच्या नेतृत्वाखालील राजस्थान रॉयल्स संघाने पटकावले होते. ऑस्ट्रेलियाचा सर्वोत्कृष्ट कर्णधार असलेला शेन वॉर्न हा जगातील अव्वल दर्जाचा फिरकीपटू होता. वॉर्नने २००८ मध्ये नव्या दमाच्या खेळाडूंना सोबत घेऊन एमएस धोनीच्या चेन्नई सुपर किंग्जचा पराभव करत हे जेतेपद जिंकले होते. पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज सोहेल तन्वीर आणि ऑस्ट्रेलियन अष्टपैलू शेन वॉटसन यांच्यासमवेत एक उत्कृष्ट गोलंदाजी आक्रमण तयार केले, ज्याने संघाला विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. राजस्थानने वॉर्नच्या नेतृत्वाखाली पुढील १३ पैकी ११ सामने जिंकले होते.शेन वॉर्ननंतर भारताचा कमाल फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे यांनी २००९ मध्ये काही काळ रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर संघाचे नेतृत्व केले होते. २००८ मध्ये आरसीबीने राहुल द्रविडच्या जागी कुंबळेंना कर्णधारपद दिले. त्या हंगामात कुंबळेंच्या नेतृत्वाखाली आरसीबीचा संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचला जिथे डेक्कन चार्जर्सने त्यांचा पराभव केला. २००९ मध्ये कुंबळे हे आरसीबीसाठी सर्वाधिक विकेट घेणारे आणि टुर्नामेंटमध्ये दुसऱ्या क्रमांकावरील यशस्वी गोलंदाज होते. ५ धावांवर ५ विकेट हा त्यांचा सर्वोत्तम गोलंदाजी आकडा होता. कुंबळेंनंतर २०१६ मध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाने भारताचा वेगवान गोलंदाज जहीर खानला संघाचे कर्णधारपद दिले होते. भारतीय संघ किंवा प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कधीच संघाचा कर्णधार नसलेल्या जहीरने आयपीएलमध्ये मात्र संघाचे नेृत्व केले होते. आयपीएल २०१८ मध्ये किंग्ज इलेव्हन पंजाब संघाने जगातील नंबर वन कसोटी गोलंदाज असलेला रवीचंद्रन अश्विन याला कर्णधारपद दिले होते, पण तो फारशी चांगली कामगिरी करू शकला नाही. आयपीएल २०११ मध्ये आरसीबी संघाने न्यूझीलंड संघाचा अष्टपैलू खेळाडू डॅनियल वेटोरी याला कर्णधारपद दिले होते. २०१२ मध्ये हरभजन सिंगने मुंबई इंडियन्स संघाचे कर्णधारपद भूषवले होते. सनरायझर्स हैदराबाद संघाने नियमित कर्णधार एडन मार्करम राष्ट्रीय संघासाठी सामने खेळत असल्याने २०२३ मध्ये सुरुवातीचे काही सामने भुवनेश्वर कुमार संघाचा कर्णधार होता.

### कमिन्सच्या खांद्यावर मोठी जबाबदारी

» रवींद्र जडेजा २०२२ मध्ये चेन्नई सुपर किंग्ज संघाचा कर्णधार होता. २०२२चा हंगाम सुरू होण्यापूर्वी धोनीच्या जागी चेन्नई संघाचा कर्णधार म्हणून जडेजाची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्याने सीझनच्या मध्यातच धोनीकडे कर्णधारपद पुन्हा सोपवले. २०२३ च्या आयपीएलमध्ये शिखर धवनला दुखापत झाली होती, त्यामुळे पंजाब किंग्ज संघाच्या सहा सामन्यांमध्ये सॅम करनने संघाचे नेतृत्व केले होते. त्याचसोबत हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीत अफगाणिस्तानचा गोलंदाज रशीद खान संघाचा कर्णधार होता.आयपीएल २०२४ मध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाने ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सला संघाचे कर्णधारपद सोपवले आहे. एसए-ट्रेन्टी लीगमध्ये सलग दोन वर्षे सनरायझर्स इस्टर्न केप संघाला जेतेपद मिळवून देणारा एडन मारक्रम आयपीएलमध्येही हैदराबाद संघाचा कर्णधार होता. पण कमिन्सला संघात सहभागी करताच त्यांनी मार्करमऐवजी कमिन्सवर विश्वास दाखवला. कमिन्सने टी-२० फॉरमॅटमध्ये यापूर्वी कधी कर्णधारपद भूषवलेले नाही. कमिन्स फारच कमी टी-२० लीग खेळतो. कमिन्स हा एक वेगवान गोलंदाज असून त्याला दुखापतींची शक्यताही आहे.

# दुखापत काही केल्या श्रेयस अय्यरची 'पाठ' सोडेना

## अय्यर आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकण्याची शक्यता

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ अवघ्या काही दिवसांवर आलेली असताना श्रेयस अय्यरच्या पाठीच्या दुखापतीने पुन्हा डोकं वर काढलं आहे. त्यामुळे आयपीएल २०२४ च्या सुरूवातीच्या काही सामन्यांमध्ये त्याच्या खेळण्याबाबत निश्चितता नसल्याचे म्हटले जात आहे. वानखेडे स्टेडियमवर रणजी ट्रॉफी फायनलमध्ये दुसऱ्या डावात ९५ धावांची खेळी करताना भारतीय फलंदाजाच्या पाठीची दुखापत पुन्हा सुरू झाली आहे.**




रणजी ट्रॉफी २०२४ चा अंतिम सामना मुंबई आणि विदर्भ यांच्यात १० मार्चपासून मुंबईतील वानखेडे क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाचे अनुभवी आघाडीचे फलंदाजही मुंबईकडून खेळत होते. दुसऱ्या डावात अय्यरची बॅट चांगलीच तळपली. त्याने १० चौकार आणि ३ षटकार लगावत ९५ धावांची झंझावाती खेळी खेळली . पण या खेळीनंतर अय्यरची जुनी दुखापत पुन्हा उफाळून आली, जी त्याच्या आयपीएल फ्रँचायझी कोलकाता नाइट रायडर्ससाठी तणावाची बाब आहे.टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, श्रेयस अय्यर रणजी ट्रॉफी फायनलच्या चौथ्या दिवशी मैदानात न उतरता स्कॅनसाठी रुग्णालयात गेला होता.एवढेच नाही तर ९५ धावांच्या खेळीदरम्यान पाठीच्या दुखण्यामुळे त्याने मुंबईच्या फिजिओकडून उपचारही घेतले. त्याच्या पाठीच्या याच दुखापतीवर गेल्या वर्षी शस्त्रक्रिया केली होती. रणजी ट्रॉफी फायनलच्या पाचव्या दिवशी आणि २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएलच्या सुरुवातीचे सामने तो खेळू शकणार नाही. पाठदुखीमुळे अय्यर या मोसमातील रणजी ट्रॉफीचे दोन सामने खेळू शकला नव्हता.अय्यरने अलीकडेच इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान झालेल्या दुखापतीबाबत भारतीय संघ व्यवस्थापनाला माहिती दिली.

### 101 आयपीएल सामने खेळले

» होती. ही दुखापत कोलकाता नाईट रायडर्ससाठी मोठी चिंतेची बाब ठरणार आहे, कारण अय्यर आयपीएलसाठी संघाचा नियमित कर्णधार आहे. संघाचा पहिला सामना २३ मार्च रोजी कोलकाता येथे सनरायझर्स हैदराबादविरुद्ध होणार आहे. श्रेयस अय्यर गेल्या वर्षीही दुखापतीमुळे आयपीएल खेळू शकला नव्हता. त्याच्या जागी कोलकाता नाईट रायडर्सचे नेतृत्व नितीश राणाने केले होते. २०२२ मध्ये श्रेयसला कोलकाता संघाचे कर्णधारपद मिळाले होते. पण त्याच्या दुखापतीमुळे त्याला संघाचे नेतृत्व करण्याची आणि कर्णधार म्हणून चमकदार करण्याची फारशी संधी मिळाली नाही. श्रेयस अय्यरने २०१५ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. तेव्हापासून, त्याने १०१ आयपीएल सामने खेळले आहेत.